# विस्तार शिक्षण संचालनालय
## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला - ४४४ १०४

**डॉ. धनराज उंदिरवाडे**
**संचालक, विस्तार शिक्षण**

फोन :(०७२४) २२५८१७४
ईमेल: deepdkv@yahoo.com


जा.क्र.संविशि/मुविशिअ/शा.शे./दि/२०२५/१०७९/२०२५
दि.:०४/०८/२०२५

## परिपत्रक

भारताच्या हरित क्रांतीचे जनक, भारत रत्न डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांचा जन्मदिवस, दिनांक **७ ऑगस्ट**, महाराष्ट्र शासनाने **"शाश्वत शेती दिन"** म्हणून घोषित केला आहे. डॉ. एम. एस. स्वामिनाथन यांनी महाराष्ट्रातील शेती आणि शेतकऱ्यांसाठी मूलगामी विचार, शास्त्रीय मार्गदर्शन आणि धोरणात्मक योगदान दिले. त्यांच्या कार्यामुळे महाराष्ट्रातील लाखो शेतकऱ्यांना दिशा मिळाली.

या निमित्ताने आपल्या विद्यापीठात डॉ. के. आर. ठाकरे सभागृह, कृषी महाविद्यालय, अकोला येथे मा. कुलगुरू महोदय यांच्या अध्यक्षेतेखाली **गुरुवार दि. ०७/०८/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता** कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे.

या कार्यक्रमाकरिता डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठातील सर्व नियंत्रक अधिकारी / कार्यालय प्रमुख / विभाग प्रमुख / यांना कळविण्यात येते कि त्यांनी स्वतः तसेच त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व अधिकारी / कर्मचारी आणि विद्यापीठातील सर्व विद्यार्थी यांना सदर कार्यक्रमामध्ये प्रत्यक्ष सहभागी होणेबाबत निर्देश द्यावेत.

मा. कुलगुरू महोदय यांचे मंजुरीने निर्गमित.

संचालक विस्तार शिक्षण
डॉ. पं दे कृ वि अकोला

**प्रतिलिपी**

१. संचालक संशोधन/ अधिष्ठाता (कृषी)/अधिष्ठाता (कृषी अभियांत्रिकी)/ अधिष्ठाता (उद्यानविद्या), डॉ. पं दे कृ वि अकोला
२. विद्यापीठ नियंत्रक / विद्यापीठ अभियंता/ विद्यापीठ जनसंपर्क अधिकारी, डॉ. पं दे कृ वि अकोला
३. सर्व सहयोगी अधिष्ठाता / विभाग प्रमुख / वरीष्ठ संशोधन शास्त्रज्ञ, डॉ. पं दे कृ वि अकोला
४. प्रभारी अधिकारी (ARIS Cell) डॉ. पं दे कृ वि अकोला यांना विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याकरिता
५. मा. कुलगुरू डॉ. पं दे कृ वि अकोला यांचे तांत्रिक सचिव मा. कुलगुरू यांच्या माहितीस्तव